विधानमंडळाच्या जून २०१९ च्या (पावसाळी) अधिवेशनात पुरवणी - मागणीस मान्यता दर्शविल्याप्रमाणे ६० टक्के निधी वितरणास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक- अ.वि.वि.-२०१९/प्र.क्र.३२/का-७
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३१ ऑगस्ट, २०१९

वाचा:- वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई यांचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ -३,दि.८ जुलै,२०१९.

प्रस्तावना :-

दि.१८.०६.२०१९ रोजी मा. मंत्री (वित्त व नियोजन) यांनी केलेल्या अर्थसंकल्पिय भाषणात जाहीर केलेल्या अल्पसंख्याक समुदायातील महिला व युवकांना विविध रोजगाराच्या संधी उपलब्ध करु देण्यासाठी कौशल्य विकास कार्यक्रम, तंत्र शिक्षण व इतर रोजगार उपयोगी साहित्य देण्याच्या योजने करिता सन २०१९ च्या पावसाळी अधिवेशनात रु.५०.०० कोटी इतक्या रकमेच्या पूरवणी मागणीस विधानमंडळाने मान्यता दर्शविली आहे. त्यापैकी माहे जुलै ते डिसेंबर साठी ६०% इतक्या निधी वितरणास नियोजन व वित्त विभागाने सहमती दर्शविली आहे. सदर सहमतीच्या अनुषंगाने निधी वितरणाची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय-:

अल्पसंख्याक समुदायातील महिला व युवकांना विविध रोजगाराच्या संधी उपलब्ध करु देण्यासाठी कौशल्य विकास कार्यक्रम, तंत्र शिक्षण व इतर रोजगार उपयोगी साहित्य देण्याच्या योजने करिता जून २०१९ च्या पावसाळी अधिवेशनात मागणी क्र. झेड.ई.-१, २२३५,सामाजिक सुरक्षा व कल्याण-०२, समाज कल्याण, २००-इतर कार्यक्रम (०१) अल्पसंख्याक सहाय्य, (०१)(०९) अल्प कालावधीच्या व्यवसायाधारित पाठ्यक्रमाकरिता सहाय्यक अनुदान, (कार्यक्रम), (२२३५ A १५१), ३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या लेखा शीर्षाखाली रु. ५०.०० कोटी इतका निधी पुरवणी मागणीव्दारे मंजूर करण्यात आला आहे.

प्रस्तुत प्रकरणी पुरवणी मागणी द्वारे मंजूर करण्यात आलेल्या रु.५०.०० कोटी इतक्या निधीपैकी माहे जुलै ते डिसेंबर साठी ६० % निधी म्हणजेच रु. ३०.०० कोटी (रुपये तीस कोटी फ़क्त) इतका निधी वितरण करण्यास या शासन शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौ. सं.क्र.१८९/२०१९/व्यय-१/वि.वि., दि. २.८.२०१९ अन्वये दिलेल्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे. तसेच सदर निधीचा विनियोग करताना वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/ अर्थ -३,दि.८ जुलै,२०१९ अन्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०८३११६०१५२२६१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dinesh M. Sonavane

Digitally signed by Dinesh M. Sonavane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9cabb099fd0576208f4caa310d2e7860201ab5363a2133e0927ff26c0f016fdf, 2.5.4.45=032100CD9D66225CED8BAE27E0E1249D39EC14A54419D0A13504B49333B23F92B58199, cn=Dinesh M. Sonavane
Date: 2019.08.31 16:07:20 +05'30'

(दि. मा. सोनवणे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.प्रधान सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग ,मंत्रालय,मुंबई यांचे स्वीय सहायक
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र -१, मुंबई
३. अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई
४. उप सचिव (का-९), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
५. उपसचिव,वित्त विभाग (व्यय -१ /अर्थ-१४), मंत्रालय, मुंबई
६. उप सचिव,नियोजन विभाग (१४७१) मंत्रालय, मुंबई
७. कक्ष अधिकारी, (का-९), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
८. निवडनस्ती.